जोडपत्र

एफ क्र.१/३४/२०१३-आयआर
भारत सरकार
आस्थापना, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय,
(आस्थापना व प्रशिक्षण विभाग)

नॉर्थ ब्लॉक १६ मार्च २०१६.

## कार्यालयीन ज्ञापन

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याचे कलम ४ अन्वये स्वाधिकारे प्रकट केल्यावरुन तज्ञांच्या समितीने केलेल्या शिफारशींचे परीक्षण करण्यासाठी डॉ.देवेष चतुर्वेदी, सह सचिव, आस्थापना व प्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी इतर गोष्टींबरोबरच त्यासाठीच्या उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी श्री. ए .एन. तिवारी, माजी मुख्य माहिती आयुक्त व डॉ. एम.एम.अन्सारी, माहिती आयुक्त, केंन्द्रीय माहिती आयोग यांचा समावेश असलेली एक तज्ञांची समिती गठित केली होती. या समितीने सादर केलेला तिचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे आणि समितीच्या शिफारशींचे अनुपालन करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना २९ जून २०१५ रोजी कार्यालयीन ज्ञापन काढण्यात आले. त्यानंतर आस्थापना व प्रशिक्षण विभागाने यासंदर्भात सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना कार्यालयीन ज्ञापन क्र.१.१.२०१३-आयआर, दि. ९ जुलै, २०१५ अन्वये अर्जदारांकडून वारंवार मागविलेल्या माहितीचे विभागाने विश्लेषण केले पाहिजे व ती माहिती त्यांच्या स्वाधिकारात संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली पाहिजे अशा सूचना दिल्या आहेत.

२. सक्षम प्राधिकाऱ्याने आणखी असे निदेश दिले आहेत की, -

१. सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी त्यांच्या स्वाधिकारात कोणती माहिती संकेतस्थळावर टाकावयाची याबाबत सल्ला देण्याच्या दृष्टीने, प्रमुख हितसंबंधित व्यक्ती, संघ यांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आळीपाळीने पध्दतशीर व नियमितपणे कामकाजाची देवाणघेवाण होण्याबाबत सार्वजनिक प्राधिकरण त्यांचा समावेश असलेली समंत्रक समिती घटित करील.

२. ज्या ठिकाणी लोकांशी संबंध येत असेल अशा प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहिती/कागदपत्रे यांविषयी नागरिकांना अवगत करण्यासाठी व माहितीचा अधिकार अधिनियमाखाली सातत्याने मागविण्यात येणारी माहिती नागरिकांसाठी मुद्रित स्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी आणि माहितीचा अधिकार नियम,२०१० अनुसार माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी माहिती व सुविधा केंद्रे सुरु करावीत.

३. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अर्जदारांकडून सातत्याने मागविण्यात येणाऱ्या माहितीचा प्रवर्ग निश्चित करण्यासाठी माहितीच्या अधिकारासाठी केलेले अर्ज व अपील यासंबंधातील दांडगा अनुभव असलेली जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी, यांची एक समिती

पुढील पृष्ठावर...........

स्थापन करण्यात यावी. अशी माहिती वापरकर्त्यास सहजपणे वापरता यावी, अशा रीतीने सार्वजनिकरीतीने उघड करण्यात आली पाहिजे आणि तिचा नियमित कालावधीनंतर आढावासुध्दा घेण्यात आला पाहिजे.

४. स्वत: सक्रियपणे देण्यात आलेली माहिती अशाप्रकारे वर्गीकृत व एकत्रित केलेली असावी की जेणेकरुन ती पुन्हा मिळविता येणे सुलभ होईल. संकेत स्थळावरील माहिती अशा रीतीने टाकण्यात येईल की लोकांना त्यांचे अभिलेख मिळविण्याच्या दृष्टीने शोधता येण्याजोगी व पुन्हा मिळविता येण्याजोगी असावी. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या नोडल (मुख्य) अधिकाऱ्यास यासाठी जबाबदार धरण्यात यावे.

५. कलम ४ च्या अनुपालनासंबंधातील प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाचे केतस्थळ व अन्य माध्यम व प्रकाशन यावर ती माहिती ज्या दिनांकास टाकण्यात आली/मुद्रित करण्यात आली होती तो दिनांक (प्रत्येक माहिती टाकण्याबाबत समुचित) टाकण्यात आला पाहिजे.

६. प्रत्येक मंत्रालय/ विभाग/ सार्वजनिक प्राधिकरण या अंतर्गत येणाऱ्या आणि राज्ये व संघराज्य क्षेत्रांमधील संबंधित प्रशिक्षण संस्थांना पारदर्शक परिनिरीक्षणे करण्याचे काम सोपविण्यात यावे.

(गायत्री मिश्रा)
संचालक (मा.अ.)
दूरध्वनी २३०९२७५५.

प्रति,
सर्व मंत्रालयाचे विभाग
एनआयसी, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली संकेतस्थळावर
माहिती टाकण्याच्या विनंतीसह प्रत रवाना.